# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:05.02.2026** **वार:गुरुवार**

---

•जागतिक व्यासपीठावर ग्लोबल साऊथचा बुलंद आवाज म्हणून भारताची ओळख - पंतप्रधानांचं राष्ट्रपती अभिभाषणावरील धन्यवाद चर्चेत प्रतिपादन

•भारत टॅक्सी सेवेचा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते प्रारंभ

•नाशिकमधील वाहन उत्पादनाच्या निर्यात मागणीमुळे वाहन उद्योग क्षेत्राला मोठं बळ मिळणार असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

•रत्नागिरी जिल्ह्यातील धामणवणे इथं होणार 'बांधावरचं संमेलन'

•19 वर्षांखालील युवकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारत आणि इंग्लंड संघांदरम्यान आज अंतिम सामना.

**पंप्रभाषण**

जागतिक व्यासपीठावर ग्लोबल साऊथचा बुलंद आवाज म्हणून भारताची ओळख निर्माण झाल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावाच्या चर्चेला त्यांनी राज्यसभेत उत्तर दिलं. गेल्या काही दिवसांत जागतिक पातळीवर अनेक मोठे व्यापारी करार भारतानं केल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं.

दरम्यान, पंतप्रधानांनी फक्त राज्यसभेत भाषण करण्याला कॉंग्रेस अध्यक्ष तथा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आक्षेप घेतला. खरगे यांनी माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या पुस्तकातला मजकूर वाचून दाखवायची परवानगी सभापतींकडे मागितली, ती नाकारण्यात आली. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला.

तत्पुर्वी, राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा धन्यवाद प्रस्ताव लोकसभेत काल आवाजी मतदानानं मंजूर झाला. या मंजुरीचा प्रस्ताव खासदार सर्वानंद सोनोवाल यांनी मांडला, त्याला खासदार तेजस्वी सूर्या यांनी अनुमोदन दिलं.

त्याआधी सभागृहात कामकाज सुरू झाल्यावर अध्यक्ष ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या परवाच्या वर्तनावर खेद व्यक्त केला. सभागृहात घडलेल्या घटनांचा उल्लेख करत, अशा अनुचित घटनेच्या शक्यतेमुळे आपणच पंतप्रधानांना सदनात येऊ नये, अशी विनंती केल्याचा खुलासाही अध्यक्ष बिर्ला यांनी केला.

विरोधी पक्षाच्या वारंवार केलेल्या घोषणाबाजीमुळे लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. दरम्यान, विरोधकांना बोलू दिलं जात नसल्याचा आरोप करत संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ झाला.

**<u>भारत टॅक्सी</u>**

सहकारातून समृद्धीच्या दिशेने केंद्र सरकारनं आणखी एक महत्त्वाचं पाऊल टाकलं आहे. देशातील पहिली सहकार आधारित,ॲपद्वारे  चालणारी वाहन सेवा 'भारत टॅक्सी' चं केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते काल उद्घाटन झालं. देशातील सहकार क्षेत्राला बळकटी देणं आणि सर्वसमावेशक, नागरी-केंद्रित परिवहन उपाययोजनांना चालना देणं हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. भारत टॅक्सीची संकल्पना दळणवळण क्षेत्रातला एक परिवर्तनकारी उपक्रम ठरेल आणि पुढील  तीन वर्षांत देशभरात या सेवेचा विस्तार होईल असा विश्वास शहा यांनी व्यक्त केला.

यादवारे 'बाईक दीदी' सारखे उपक्रम राबवले जात असून आतापर्यंत दीडशेहून अधिक महिला चालक भारत टॅक्सीमध्ये सहभागी झाल्या आहेत. भारत टॅक्सी सेवा शून्य कमिशन आणि अतिरिक्त शुल्कमुक्त किंमत मॉडेलवर कार्यरत राहणार असून, नफ्याचा थेट लाभ चालकांना मिळणार आहे.

**<u>जिपनिवडणूक</u>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायतसमित्यांच्या निवडणुकीचा प्रचाराचा काल समारोप झाला. यासाठी उद्या मतदान होणार असून, नऊ तारखेला मतमोजणी होईल. या निवडणुकांसाठी मतदारांना आपलं नाव आणि मतदान केंद्र सहज शोधता यावं, यासाठी राज्य निवडणूक आयोगानं मताधिकार हे मोबाईल ॲप उपलब्ध करून दिलं आहे.

**<u>महापौर-</u>**

दरम्यान नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर पदी भाजपाच्या सुजाता सूरज पाटील यांची तर उपमहापौर पदी भाजपाचे दशरथ सीताराम भगत यांची बिनविरोध निवड झाली आहे.

**<u>वाहनऑर्डर</u>**

महिंद्रा वाहन उद्योग कंपनीकडे इंडोनेशियामधून ३५ हजार गाड्यांची मागणी नोंदवण्यात आली आहे. या सर्व गाड्या कंपनीच्या नाशिक इथल्या प्रकल्पात तयार होणार आहेत. महाराष्ट्राच्या वाहन उद्योग क्षेत्राला यामुळे मोठं बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. २०२६ पर्यंत या सर्व गाड्यांची इंडोनेशियाला निर्यात करण्यात येणार असून, यामुळे रोजगार, गुंतवणूक आणि 'मेक इन महाराष्ट्र' उपक्रमाला चालना मिळणार आहे.

**<u>पल्स</u>**

वैद्यकीय क्षेत्रात जागतिक स्तरावर महाराष्ट्राला ओळख निर्माण करून देणाऱ्या 'पल्स' या वैद्यकीय परिषदेचे आयोजन मुंबईत जिओ वर्ल्ड सेंटर, इथं २७ आणि २८ मार्च रोजी करण्यात येणार आहे. या परिषदेत देशातून आणि जगभरातून वैद्यक क्षेत्रातील अडीच हजारांहून अधिक तज्ज्ञ, अभ्यासक आणि मान्यवर सहभागी होणार आहेत. 'पल्स' वैद्यकीय परिषदेचे भव्य आयोजन करून परिषदेच्या माध्यमातून 'वेलनेस' उपचारांचा वैद्यकीय पर्यटनातील 'महाराष्ट्र ब्रँड' निर्माण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी परिषद आयोजनाच्या आढावा बैठकीत दिले. यावेळी वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या.

**<u>वॉका-बांधावरचे-संमेलन</u>**

**<u>इंट्रो-</u>**

माणूस, माती आणि नाती यांचं बंध उलगडणारा साहित्यिक सहवास' या बोधवाक्यासह रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूणनजिक धामणवणे इथं 'बांधावरचं संमेलन' येत्या रविवारी आठ तारखेला होत आहे. शेणानं सारवलेल्या शेताच्या बांधावर दीप प्रज्वलन, सातेरी माता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वारुळांचं पूजन आणि गंगाजलानं भरलेल्या मातीच्या घटाचं पूजन, आरज लावून आणि भलरी गाऊन संमेलनाचं उद्घाटन होणार आहे. त्याचा हा वृत्तांत...माझ्या सहकारी मेघना देशपांडे यांच्याकडून...

**<u>स्क्रीप्ट-</u>**

साहित्याचा पहिला प्रसव कष्टाच्या घामातून आकाराला आला, तेव्हापासून त्याचं नातं लाल-काळ्या मातीशी एकरूप झालेलं आहे. साहित्याचा कोणताही शब्द आशयरूप घेताना आकाशाच्या पांघरुणाखाली आणि निसर्गाच्या कुशीत

खेळतो, बागडतो तेव्हा त्याला कोणत्याही कृत्रिम आवरणाची गरज भासत नाही. मंडप, मंच, खुर्च्या हव्यात कशाला; हा विचार करून चिपळूणच्या साहित्यिक परिवारानं काजूच्या झाडांच्या घनदाट छायेत या संमेलनाचं आयोजन केलं आहे. गाव आणि शहराच्या सीमा पुसून सर्व लिहित्या हातांना आणि गाणाऱ्या मनांना एकत्र आणणं हा या संमेलनाचा मुख्य उद्देश असला तरीही मराठी बोलींच्या ओठी असलेल्या भावभावना प्रमाण मराठी भाषेच्या ओटीत घालाव्यात हा त्यातील मतितार्थ आहे. सातेरीच्या साक्षीनं, खळाळतं पाणी आणि पक्ष्यांच्या गाण्यांसोबत जमिनीवर बैठक मारून घरगुती ग्रामीण कोकणी व्यवस्थेतील हा साहित्याचा सोहळा मराठी साहित्य क्षेत्रातील पहिलाच अभिनव प्रयोग ठरतो आहे. संमेलनाचं उद्घाटन डॉक्टर प्रशांत पटवर्धन यांच्या हस्ते होईल. प्राध्यापक सुहास बारटक्के संमेलनाचे अध्यक्ष तर शशिकांत मोदी स्वागताध्यक्ष आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चिपळूण शाखेनं संमेलनाचं आयोजन केलं असून कोमसाप आणि साहित्य भारतीची चिपळूण शाखा सह-आयोजक आहेत.

**<u>प्रदर्शन</u>**

मुंबईतील नेहरू विज्ञान केंद्रात कालपासून पाचव्या क्रिएटीव्ह आयडियाज अँड इनोव्हेशन्स इन ॲक्शन प्रदर्शन आणि पुरस्कार सोहळ्याला सुरुवात झाली आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शैलजा डोनमपुडी यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं उद्घाटन करण्यात आलं. देशभरातील १५० हून अधिक संस्थांकडून आलेल्या ६५६ अर्जांमधून निवड करण्यात आलेल्या अव्वल १०० प्रकल्पांचं या प्रदर्शनात सादरीकरण होत आहे. यामध्ये इंजिनिअरिंग, औषधनिर्माणशास्त्र, जैवशास्त्र आणि केमिकल टेक्नॉलॉजी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण स्टार्टअप्स आणि विद्यार्थ्यांचे प्रकल्प समाविष्ट आहेत. हे प्रदर्शन उद्यापर्यंत खुलं आहे.

**<u>अग्निशमन-</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलानं राजस्थानमधील उदयपूर इथं नुकत्याच झालेल्या 'अखिल भारतीय अग्निशमन सेवा क्रीडा स्पर्धा २०२६' मध्ये ६४ पदके जिंकली आहेत. यात २१ सुवर्ण, २१ रौप्य आणि २२ कांस्य पदकांचा समावेश आहे. देशभरातील १ हजार २०० हून अधिक अग्निशमन दलांचे जवान या स्पर्धेत सहभागी झाले होते.

**<u>कोयाकृषीकुंभ</u>**

कृषी विभाग आणि 'आत्मा' यांच्या संयुक्त विद्यमानं गडचिरोली इथं कालपासून कोया कृषी कुंभ महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवाचा शुभारंभ राज्याचे कृषी आणि वित्त राज्यमंत्री तथा सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते झाला. या पाच दिवसीय महोत्सवात विविध धान्य, अवजारे, यंत्र आणि खाद्यपदार्थांची दालनं असून, चर्चासत्रांमध्ये तज्ज्ञांची व्याख्यानं आयोजित करण्यात आली आहेत.

**निलंबन**

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यामधील लाहेरी इथल्या शासकीय आश्रमशाळेतील ६० हून अधिक विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याप्रकरणी प्रकल्प अधिकाऱ्यांनी शाळेचे मुख्याध्यापक आणि वसतिगृहाचे अधीक्षक यांना निलंबित केलं असून, सहा कर्मचाऱ्यांची वेतनवाढ एक वर्षासाठी रोखली आहे.२८ जानेवारीला लाहेरी येथील शासकीय आश्रमशाळेत जवळपास ६० विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली होती. .

**क्रिकेट**

19 वर्षांखालील युवकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामना आज भारत आणि इंग्लंड यांच्या दरम्यान झिंबाब्वे मध्ये होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी १ वाजता सुरू होईल. भारताने काल हरारे येथे झालेल्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात अफगाणिस्तानचा सात गडी राखून पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. तर इंग्लंडनं बुलावायो इथं झालेल्या पहिल्या उपांत्य फेरीत गतविजेत्या ऑस्ट्रेलियाचा २७ धावांनी पराभव केला होता. भारतीय संघानं आत्तापर्यंत या स्पर्धेतील सर्व सामने जिंकले असून भारतीय संघ या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघ आहे. भारतानं आत्तापर्यंत 5 वेळा विश्वचषकाला गवसणी घातली आहे तर ऑस्ट्रेलियानं चार वेळा हा विश्वचषक जिंकला आहे.

**हवामान**

उत्तर कोकणात किमान तापमानात सरासरीपेक्षा लक्षणीय वाढ झाली असून दक्षिण कोकण आणि मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात किंचित वाढ झाली आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**